# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

फोन ०२०-२५६०१२१४
फॅक्स ०२०-२५६०१२०६
website : www.unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे – ४११ ००७
email : **st-science**@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/बी.एस्सी./ ७९७

दि. ०६.०७.२०१८

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व संलग्न बी.एस्सी.(Regular)महाविद्यालये

विषय : बी.एस्सी. (Regular) मार्च /एप्रिल, २०१८ परीक्षेच्या गुणपत्रिकांबाबत

महोदय/महोदया,

मार्च /एप्रिल, २०१८ मध्ये झालेल्या बी.एस्सी. (Regular) परीक्षेचा निकाल शुक्रवार, दि. २२.०६.२०१८ रोजी जाहिर करण्यात आला आहे. परीक्षेची गुणपत्रके खालीलप्रमाणे वितरित करण्यात येतील.

१. पुणे शहर, व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी गुरूवार, दिनांक १२.०७.२०१८ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत परीक्षा विभागातून गुणपत्रके घेवून जायची आहेत.

२. नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून मंगळवार, दिनांक १०.०७.२०१८ रोजी दुपारी १२.०० ते ५.०० या वेळेत घेवून जायचा आहे.

३. अहमदनगर जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून मंगळवार, दिनांक १०.०७.२०१८ रोजी दुपारी १२.०० ते ५.०० या वेळेत घेवून जायचा आहे.

४. अहमदनगर जिल्हयातील अकोले, राहाता, कोपरगाव आणि संगमनेर तालुक्यातील सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संगमनेर नगरपालिका आर्टस डी.जे.मालपाणी कॉमर्स आणि बी.एम.सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर – ४२२ ६०५ येथून मंगळवार, दिनांक १०.०७.२०१८ रोजी दुपारी १२.०० ते ५.०० या वेळेत घेवून जायचा आहे.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके निकाल जाहिर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता, महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. त्यानंतर त्यातील दुरुस्त्या त्वरीत करुन घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेऊन जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

कळावे.

आपला,
06/7/18

सहाय्यक कुलसचिव,
(छाननी व तालिनीकरण)

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक/संगमनेर/अहमदनगर यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना देण्याची व्यवस्था करावी.
२. मा. प्राचार्य, संगमनेर नगरपालिका आर्टस डी.जे.मालपाणी कॉमर्स आणि बी.एम.सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर – ४२२ ६०५